# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/ 8802 /२०२० दिनांक ०३/०४/२०२०

## परिपत्रक

आपला देश आणि राज्य सध्या कोरोना व्हायरच्या (कोव्हीड—१९) अत्यंत गंभीर अशा संकटातून जात आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन कोरोना व्हायरसचा (कोव्हीड—१९) प्रकोप रोखण्यासाठी प्रयत्नशील आहे. विद्यापीठाने सुरूवातीपासूनच स्वच्छतेसंदर्भात विविध उपाययोजना केल्या असून या व्यायरसचा प्रकोप एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीद्वारे पसरू नये म्हणून शासनाच्या निर्देशानुसार प्राचार्य, प्राध्यापक, संशोधन, अधिकारी व कर्मचारी यांनी आपलया घरी राहून विभागाचे कामकाज (Work from Home) करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच कोरोना विषाणूचा संसर्ग होऊ नये म्हणून वारंवार साबण व पाणी वापरून आपले हात स्वच्छ धुण्याचे, शिंकतांना व खोकतांना आपल्या नाकावर व तोंडावर रूमाल किंवा टिश्यु पेपर धरण्याचे, इतरांपासून किमान एक मीटर दुर रहाण्याचे, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेण्याचे, फळे भाज्या धुऊन खाण्याचे व श्वसन संस्थेचे विकार असणाऱ्या व्यक्तींशी संपर्क ठेवतांना संसर्ग न होण्याची काळजी घेण्याबाबतचे आवाहन विद्यापीठाद्वारे सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.

देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे की, आपण आपल्या देशासाठी काहीतरी केले पाहिजे. या भावनेतून आपण सर्वांनी मिळून कोरोना (कोव्हीड—१९) विरूध्दच्या लढाईसाठी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरिता द्यावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू मा. एन. व्ही. कल्याणकर यांनी आपणास केले आहे. मा. कुलगुरूंनी केलेल्या आवाहनाला अनुसरून विद्यापीठातील जे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यमंत्री निधीत एक दिवसाचे वेतन स्वेच्छेने देऊ इच्छित नाहीत अशानी वित्त व लेखा अधिकारी यांना faogug@gmail.com या ई—मेलवर दिनांक ०७/०३/२०२० पर्यंत कळवावे, तसे न कळविल्यास त्यांची समती आहे असे गृहीत धरून एक दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी याबाबत त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळवावे व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी याबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही घेऊन विद्यापीठाला अहवाल सादर करावा.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहितीकरीता अग्रेषित :**

१) विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य.
३) विद्यापीठातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख

यांनी उपरोक्त परिपत्रक आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे निदर्शनास आणून द्यावे.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव

महाराष्ट्र शासन
सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

दुरध्वनी क्रमाक. ०७१२ २५६१७१३
Email: jdhengp@rediffmail.com

Website:www.jdnagpur.in
Email: rjdng.dhepune@gov.in

क्रमांक:-उशिनाग/आस्था/वेतनपथक/1623 /२०२०

दिनांक ०१ एप्रिल २०२०

**ई-मेलद्वारे/अतितात्काळ**

प्रति,

१. कुलसचिव
रा.तु.म.नागपूर विद्यापीठ नागपूर/कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ रामटेक/
महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ नागपूर/गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

२. संचालक/प्राचार्य/वसतीगृहप्रमुख
सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतिगृहे, नागपूर विभाग

३. प्राचार्य
सर्व अशासकीय अनुदानित/महाविद्यालये
नागपूर विभाग

**विषय :- अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड-१९" मध्ये जमा करणेबाबतचे आवाहन.**

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/कोरोना/मवि-१/२०२०/४०८५, दिनांक ३१.०३.२०२०

संदर्भिय पत्राचे कृपया अवलोकन करावे.(प्रत संलग्न)

त्याअनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या कुलगुरू/प्राचार्य/संचालक यांना आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना आपले एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड-१९" मध्ये जमा करणेबाबत आवाहन करण्यात आले असून त्यानूसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही चा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र - वरीलप्रमाणे**

**( डॉ.महेशकुमार साळुंखे )**
सहसंचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग,नागपूर

प्रत - मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पूणे यांना संदर्भिय पत्रान्वये माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
web:www.dhepune.gov.in. E-Mail prash.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२/२६१३०६२७/२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्र.उशिसं/कोरोना मदि-१/२०२० / 4085 दिनांक 31 MAR 2020

प्रति,

१. मा.कुलगुरू,
सर्व अकृषि विद्यापीठे.

२. प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये.

**विषय : अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामधील कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी-कोविड १९" मध्ये जमा करणेबाबतचे आवाहन.**

विद्यापीठ अनुदान आयोग यांचे दि.२८ मार्च, २०२० चे पत्रान्वये व काही शिक्षक/शिक्षकेतर संघटनांनी कोरोना विषाणू प्रादुर्भावाचा मुकाबला करण्यासाठी एक दिवसाचे वेतन कपात करणेबाबत दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपला देश आणि एकूणच जग कोविड-१९ च्या आजारामुळे अभुतपूर्व संकटास सामोरे जात आहे. कोरोना विषाणूची लागण झालेल्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आपल्या सर्व शैक्षणिक संस्थाची जबाबदारी आहे की, स्वत:ला संरक्षण देण्यासाठी आणि या विषाणूचा पुढील प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि सावधगिरीच्या उपाययोजनांबद्दल लोकांना जागृत करणे इतकेच नव्हे तर शासनास या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठीच्या प्रयत्नांना बळकटी देणे ही देखील मोठी जबाबदारी आहे.

सर्व अकृषि विद्यापीठे/शासकीय महाविद्यालये/अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आवाहन करण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू केल्याने संकट निर्माण झाले आहे. संपूर्ण राज्यातील संचारबंदीमुळे रोग निवारण कामी सर्व कर्मचारी यांना सक्रिय होता येत नाही. अशा परिस्थितीत या संकटाला सामोरे जाण्यासाठी वरील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांच्या कुलगुरू/प्राचार्य/संचालक यांना आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आपले एक दिवसाचे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी कोविड-१९" मध्ये जमा करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. उपरोक्त आव्हानात्मक काळात आपल्या देशवासियांच्या आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी एकत्र उभे राहुया तसेच या महासंकटाचा मुकाबला धैर्याने व एकजुटीने करणेकामी आपले मोलाचे योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

प्रत माहितीस्तव : सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

E:\d\General.docx